अपिल अधिकारी तथा कार्यकारी अभियंता
बंडगार्डन पाणी पुरवठा
पुणे महानगरपालिका
जावक.क्र. १०६४
दिनांक. १६/०९/१७५

# माहितीचा अधिकार अधिकार २००५ चे कलम १९ (१) अन्वये अपिल

**अपिलार्थी**
श्री. किशोर काशिनाथ लष्करे
रा. स.नं १११, वडार कॉ. हौ. सोसायटी,
आळंदी रोड, विश्रांतवाडी, पुणे १५

विरूध्द

जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता
बंडगार्डन पाणी पुरवठा
पुणे महानगरपालिका

## विवेचन

अर्जदार श्री. किशोर काशिनाथ लष्करे रा. स.नं १११, वडार कॉ. हौ. सोसायटी, आळंदी रोड, विश्रांतवाडी, पुणे १५ यांनी आवक क्र. १९६ दि. १८.८.२०१७ रोजी अपिल केलेले आहे. त्या अपिलाची सुनावणी दि. १६.९.२०१७ रोजी स.११.०० वा. ठेवण्यात आली होती.

सदर सुनावणीस अपिलार्थी श्री. किशोर काशिनाथ लष्करे तसेच जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता श्री. सुरेश साखळे , सहाय्यक जनमाहिती अधिकारी श्री. बुध्दप्रकाश वाघमारे हे उपस्थित होते. सुरवातीस अपिलार्थी यांनी स. ११.०० वा ऐवजी १२.०० वा एकत्रित सुनावणी ठेवावी ही विनंती केली. त्याप्रमाणे त्यांना समक्ष अनुमती दिली. अपिलार्थी यांचा सर्वप्रथम माहिती अधिकारातील अर्ज दि. १८.५.२०१७ रोजी जनमाहिती अधिकारी यांच्याकडे आलेला आहे. त्यावर तात्कालीन सहाय्यक जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता श्री. मिलिंद घोलप यांनी पत्र जा.क्र. ४९१ दि. १४.६.२०१७ रोजी माहिती अधिकारातील माहिती क्र. २,३,४ प्रकरणे व रजिस्ट्रर स्वरूपात कार्यालयाकडे उपलब्ध आहे. त्यामधील आवश्यक ती माहिती कार्यालयीन वेळेस उपलब्ध करून दिली जाईल व आवश्यक असणा-या कागदपत्राच्या प्रत्येकी र.रू. २/- प्रमाणे मनपाच्या कोषागारात भरल्यानंतर उपलब्ध करून देण्यात येईल असे कळविलेले आहे. सदर पत्र अपिलार्थी यांना दि. २०.६.२०१७ रोजी समक्ष प्राप्त झालेले आहे. अपिलार्थी यांनी कार्यालयात येवून समक्ष कागदपत्रांची पहाणी केलेली.

# सुनावणी आदेश

अपिलार्थी यांना वरील प्रमाणे चलन भरण्याबाबत सुचित करण्यात आले होते. ती माहिती विना मोबदला देण्याबाबत मागणी केली. विहीत मुदतीत अपिलार्थी यांना माहिती मिळाली नसल्याने जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता श्री. सुरेश साखळे यांनी ८ दिवसामध्ये मुळ अर्जातील १ ते ४ बाबीची माहिती ८ दिवसात विना मोबदला देण्यात यावी.

वरील बाबीचा विचार करता अपिल निकाली काढण्यात येत आहे.

गणपत साळुंके
(मो.नं. ९६८९९३१७४२ ,)
कार्यकारी अभियंता तथा अपिल अधिकारी
बंडगार्डन पाणी पुरवठा विभाग
पुणे महानगरपालिका

**टीप** :- वरील आदेश अपिलार्थीस मान्य नसल्यास द्वितीय अपिल मा. कक्ष अधिकारी राज्य माहिती आयोग, पुणे खंडपीठ, नविन प्रशासकीय इमारत, चौथा मजला, विधानभवन समोर, पुणे १ येथे अपिलाच्या निकालापासून ९० दिवसांच्या आत अपिल करू शकतील.

प्रत :-१. श्री. सुरेश साखळे
जनमाहिती अधिकारी तथा उप अभियंता
बंडगार्डन पाणी पुरवठा विभाग
पुणे महानगरपालिका

२. श्रीमती अरूणा चौरे
सहाय्यक जनमाहिती अधिकारी तथा कनिष्ठ अभियंता
बंडगार्डन पाणी पुरवठा विभाग
पुणे महानगरपालिका